इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट, २००९.

ङा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय**:- शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम नाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता ाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी ध्यमाच्या** प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा मिती व राज्य समिती, या पैकी एक समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१८३ इंग्रजी ध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका कडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या टीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन र्णयासोबत संस्थेची नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही रुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन र्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे धनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत रले जाईल.

शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या नुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही त्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना ासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

/GR-PS-E.lwp

ELLORA MEDICALS & EDUCATION FOUNDATION
PUNE

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८२०१९३२४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ना.ऊ. शिराळे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति.
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री. (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई